१४ जुलै २०१२ पुढारी

# राष्ट्रीय छात्रसेनेत कमला कॉलेजचे यश

कोल्हापूर, दि. १३ : पंजाब डायरेक्टोरेट राष्ट्रीय छात्रसेनेतर्फे ऑल इंडिया ट्रेकिंग एक्सपिडीशन - जोगींदर नगर- बारोट (हिमाचल प्रदेश) येथे आयोजित केलेल्या कॅम्पमध्ये महाराष्ट्रांच्या संघात कमला कॉलेजची विद्यार्थिनी कु. अमृती निंबाळकर व कु. वैशाली नायकवडी तसेच कॉलेजच्या छात्रसेना विभागप्रमुख २/लेफ्ट. प्रा. सौ. वर्षा साठे यांची निवड झाली. 'बी' सर्टिफिकेट परीक्षेत कॉलेजच्या दोन विद्यार्थिनी, 'ए' ग्रेडमध्ये तर ६ विद्यार्थिनी 'बी' ग्रेडमध्ये पास झाल्या. तसेच 'सी' सर्टिफिकेट परीक्षेत जेयुओ- कु. चंदा प्रकाश नलवडे 'ए' ग्रेडमध्ये तर तीन विद्यार्थिनी 'बी' ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाल्या. या विद्यार्थिनींना कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, छात्रसेना विभागप्रमुख २/लेफ्ट. प्रा. सौ. वर्षा साठे तसेच ६ महा. गर्ल्स बटालियनचे प्रमुख लेफ्टनंट कर्नल डी. एस. धनकर यांचे मार्गदर्शन लाभले.